# ।। अमर लोक मेहमा ग्रंथ ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ ग्रंथ अमर लोक मेहमा लिखंते ।।

।। श्लोक ।।

**पढंते सुणंते सिखंते ।। प्रमधाम पावंते सही ।।**
**न्ह कर्मा निराधार ।। निर्भे सदा ।। महासुखंग ।।१।।**

हा अमरलोक ग्रंथ कोणीही हंस सतस्वरुप ज्ञान दृष्टीने वाचेल किंवा सतस्वरुप ज्ञान दृष्टीने ऐकेल किंवा सतस्वरुप ज्ञान दृष्टीने शिकेल तर त्याला परमधाम म्हणजे अमरलोक प्राप्त होईल.तो अमरलोक ने:क्रमी आहे म्हणजे त्रिगुणी मायेच्या कर्मापासून आणि होणकाळाच्या दुखांपासून मुक्त आहे.तो अमरलोक निराधार म्हणजे स्व:आधाराचा आहे. त्याला कोणाच्या आधाराची आवश्यकता नाही.तो अमरलोक निर्भय म्हणजे काळाच्या भयापासून मुक्त आहे.तो अमरलोक महाप्रलयात मायेसारखा मिटणारा नाही.तो सदा जसाचा तसा राहणारा आहे. तो अमरलोक सदा महासुखांनी पूर्ण भरलेला आहे.।।१।।


**सतश्रूप आणंदपद ।। निजनांव ।। केवळपद ।। ग्यानरूपं ।।**
**ग्यानध्यानं ।। ग्यानदिष्टं ।। सदा सुखम ।। नेहचला ।।२।।**

अमरलोक मायेचे ३ लोक १४ भवनासारखे असत नाही म्हणजे महाप्रलयात मिटणारा नाही.तो अमरलोक कालही होता,आजही आहे आणि उद्याही राहिल तसेच अशी कोणती वेळ नव्हती की तो नव्हता किंवा अशी कोणती वेळ राहणार नाही की तो राहणार नाही असा सदा, त्रिकालादी राहणारा सत आहे.अमरलोक कोऱ्या आनंदाचे पद आहे.ते मायेचे ३ लोक १४ भवन जसे आनंदासोबत दुखांनी भरलेले आहे तसे नेकमात्र ही नाही. अमरलोकात निजनाव आहे.हे नाव आदि अनादिपासून कुद्रती प्रगट आहे.हे नाव त्रिलोकीत कृत्रिम विधीने बावन्न अक्षरांनी बनतात असे बनलेले नाव नाही.हे निजनाव अखंड्ति ध्वनीस्वरुप आहे.हे निजनाव मुखाने न घेता येणारे तसेच कागदावर न लिहता येणारे कुद्रती नाव आहे.

अमरलोक हे केवलपद आहे.यात जीव सोबतचे मन आणि पाच आत्मा ही माया नाही आहे.त्यात त्रिगुणी मायेसारखे रजोगुण,सतोगुण,तमोगुण माया नाही.त्याच्यात होणकाळा –सारखे इच्छे सोबत संसार करुन सृष्टी बनविण्याची माया नाही.तो मायारहीत कोरा केवल आहे.अमरलोक विज्ञान ज्ञान स्वरुप आहे.अमरलोकाचे ध्यान विज्ञान ज्ञान स्वरुप आहे.त्याची दृष्टी माया तसेच काळाच्या पलिकड्ची विज्ञान ज्ञानाची आहे. अमरलोक निश्चल आहे.तो मायेसारखा महाप्रलयात मिटणारा नाही अमरलोक सदा विज्ञान ज्ञानाचे महासुख देणारे पद आहे.।।२।।

**अमर लोक अमर धाम ।। गुरू नांव सने सदा सुचं ।।**
**जपंते जुगत्या ग्यान डोरं ।। सर्ब कर्मा सर्ब भर्मा नासंते न्यासी ।।३।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।




अमरलोक म्हणजे अमरधाम साकारी मायेचे मृत्युलोक, स्वर्गलोक,पाताळलोक सारखा महाप्रलयात मिटत नाही. अमरलोक माया माता तसेच ब्रम्ह पिताहून वेगळे न्यारे असे गुरुपद आहे. मातेच्या पदात म्हणजे तीनलोक चौदा भवनात बावन्न अक्षरांचे नाव आहे तर गुरुपदात म्हणजे अमरलोकात बावन्न अक्षरांच्या पलिकडचे निजनाम आहे. त्या गुरुनामाने अमरलोकाच्या सर्व संतांना स्नेह आहे.ते नाव पवित्र आहे.ते नाव तीन लोकाच्या बावन्न अक्षरांच्या नावासारखे काळाच्या मुखात टाकणारे अपवित्र नाव नाही. अशा पवित्र गुरु नावाला युक्तीने म्हणजे सतस्वरुपाच्या ज्ञानाच्या दोरीने म्हणजे लिवने जपल्याने हंसाच्या घटात सतस्वरुप विज्ञान ज्ञान प्रगटते.असे सतस्वरुप विज्ञान ज्ञान हंसाच्या घटात रोम रोमात प्रगटल्याने हंसाचे सर्व कर्म नष्ट होऊन जातात आणि सोबत मायेचे सुख सत्य भासण्याचा म्हणजे भ्रमांचा नाश होऊन जातो.।।३।।

**हंसा हंसी निर्मला ।। निरपाप ।। निर्दोष ।।**
**निर्भे नांव त्रिलोक ।। नही लिपंते अलेक नांव ।।४।।**

गुरुनाव युक्तीने जपून अमरलोकात पोहचलेले हंस–हंसनी तेथे पाची विषयांचे वासना विरहीत असे निर्मळ राहतात.तेथे पोहचलेल्या हंस–हंसनीमध्ये कोणत्या प्रकारचे विकार राहत नाही.असे तेथील सर्व हंस–हंसनी निष्पाप तसेच निर्दोष राहतात.हंस–हंसनीमध्ये हे निजनाव गुरुशी स्नेह झाल्यावर प्रगटते.त्रिलोकाच्या नावाची साधना करुन हंस जे नाव प्रगट करतो त्याला काळ खातो हे भय असते.गुरुशी स्नेह करुन जे नाव हंस आपल्या घटात प्रगट करतो ते नाव निर्भय असते त्याला काळ ग्रासत नाही.ते गुरुनाव मायेने लपटलेले राहत नाही.म्हणून त्याला काळ ग्रासत नाही.हे गुरुनाव कागदावर लिहीले जात नाही.असे न लिहणारा अलेख आहे.।।४।।

**अजर नांव ।। अजीत नांव जिभ्या धारं ।।**
**नांव रटंते मुखार्बिंदं ।। सासा न सागे निराधार निरलेपं ।।५।।**

हे गुरुनाव अजर आहे म्हणजे त्रिलोकाच्या बापन्न अक्षरांचे अन्य नावासारखे महाप्रलयात मिटत नाही.हे गुरुनाव अतीत आहे.या नावाला होणकाळात कोणी जिंकू शकत नाही म्हणजे या नावाच्या आधाराने हंसाला अमरलोकात जाण्यापासून होणकाळात कोणीही अटकवू शकत नाही.रामनाम मुखाने म्हणजे जीभेने रटल्याने अजरनाव म्हणजेच अजीत नाव म्हणजेच गुरुनाव म्हणजेच निजनामाची प्राप्ती हंसाला होते.प्रगट झालेले सतनाम बिना श्वास तसेच जीभेच्या आधाराने सदा प्रगट राहते.हे गुरुनाव निर्लेप आहे म्हणजे कोणत्याही प्रकाराने मायेमध्ये लिपायमान नाही. ।।५।।

साखी ||

**राम रतन सुखराम क्हे ।। नेड़ा धऱ्यां निराट ।।**
**बिन सतगुरू सूजे नही ।। आडां ओघट घाट ।।६।।**

अमरलोकात पोहचविणारे हे रामनामरुपी रत्न म्हणजेच सतशब्द प्रत्येक हंसाच्या खूप जवळ धरलेले आहे तरीही हे नावरत्न त्याच्या आड अनेक बिकट घाट असल्या कारणाने सतगुरु शिवाय सुजत नाही. ।।६।।


**आ सायद सुण बेद मे ।। संता कही बजाय ।।**
**बिन सतगुरू सुखराम क्हे ।। अमर लोक नही जाय ।।७।।**

रामनाम म्हणजे सतशब्दानेच अमरलोकात जाता येते ही साक्ष ब्रम्हाने आपल्या वेदांमध्ये तसेच संतांनी आपल्या अणभै वाणीमध्ये वाजवून वाजवून सांगितली आहे. असे हे नाव रत्न प्रत्येकाच्या एकदम जवळ म्हणजे रोमरोमात भरलेले आहे तरीही सतगुरु शिवाय त्याच्या आड्वे मन,काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर आणि शब्द,स्पर्श, रुप, रस,गंध हे पाच विकार त्रिगुणी माया तसेच काळाने बनविलेले ज्ञान,ध्यान तसेच करण्या असे अनेक बिकट घाट असल्याकारणाने प्रगट केले जात नाही.या कारणाने हंसाला अमरलोकास जाता येत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री –पुरुषांना सांगत आहे.।।७।।

**रूम रूम मे रम रहया ।। सुणज्यो सिरजणहार ।।**
**बिन सतगुरू सुखराम क्हे ।। प्रगटे नही लगार ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,सिरजनहार परमात्मा हा हंसाच्या शरीरात रोमरोमात रमून राहिला आहे म्हणजे एकदम जवळ आहे तरीही सतगुरुच्या शरणाशिवाय कोणालाही प्रगट करता येत नाही. ।।८।।

**साचा सतगुरू जब मिले ।। शब्द बतावे भेद ।।**
**सुखराम नांव जब प्रगटे । चढे कंवळ षट छेद ।।९।।**




हंसाला जेव्हा खरे सतगुरु भेटतील आणि शब्दाचा भेद दाखवतील तेव्हा नाव हंसाच्या शरीरात प्रगट होईल आणि ते सतनाम हंसाच्या देहात पूर्वेचे ६ आणि पश्चिमेचे ६ अशा बारा कमळांचे छेदन करेल आणि हंसाला अमरलोकात घेऊन जाईल. ।।९।।

**आ सतगुरू की पारखा ।। सुण लीजो सब कोय ।।**
**निर्भे वायक कह रहया ।। ध्यान सिखर मे होय ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,पूर्ण सतगुरु निर्भय देशाचे म्हणजे

जेथे काळ पोहचत नाही अशा देशाचे ज्ञान कथत राहतात आणि त्यांचे ध्यान शिखरात म्हणजे अमरलोकात सदा राहते.या भेदानेच सतगुरु अमरलोकात पोहचविणारे आहे किंवा नाही ही सतगुरुची परीक्षा केली जाते.असे सर्व स्त्री–पुरुष तसेच ज्ञानी, ध्यानांना आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१०।।

**ध्यान परख सुखरामजी ।। चोड़े कहुँ बजाय ।।**
**नेण उलटर पट लगे ।। देह अधर ठेहरांय ।।११।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सतगुरुचे ध्यान शिखरात म्हणजे अमरलोकात राहते याची परीक्षा स्पष्ट रुपाने प्रत्येक स्त्री–पुरुष तसेच ज्ञानी,ध्यानीला समजेल अशा प्रकारे वाजवून–वाजवून सांगून राहिले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,ध्यान समाधीत सतगुरुचे डोळे उलटतात आणि आतील पट लागून जातात.ध्यान समयात त्यांचा देह बिना(जीव)चेतन आणि बिना श्वासाने अधर ठहरुन जातो.।।११।।

छन्द जात भुजंगी ।।

**त्रिलोक माहि नही आस बासा ।। मुवा न मरसी सोगन सासा ।।**
**हरता न क्रता सर्ब सुख दाई ।। हे प्रपूरण आवे न जाई ।।१२।।**

अशा सतगुरुला त्रिलोकीच्या सुखांची काही आशा राहत नाही आणि अशा सतगुरुची त्रिलोकात वस्तीही राहत नाही.ते सदा ३ लोक १४ भवन आणि पारब्रम्हच्या पलिकडे अमरलोकात राहतात.त्यांची त्रिलोकात वस्ती राहत नाही.याचा अर्थ ते मरुन गेले किंवा मरतील असे नाही आहे.ते विज्ञान दिव्य स्थितीत पोहचेले असतात.त्यांना दिव्य विज्ञानी ने:अक्षरी म्हणजे सतस्वरुपी देह प्राप्त झालेला असतो.त्यांनी सतनामाने होणकाळी मायावी देह गळवून दिला असतो आणि सतस्वरुपी देह प्राप्त केलेला असतो. जसे जगात दुसऱ्या साधकांचा पाच तत्वाचा देहासोबत मायावी देह मरतो आणि पाच तत्वाच्या देहासोबत दुसरा मायावी देह कर्म भोगण्याकरीता प्राप्त होतो असे सतगुरुचे होत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,अमरलोकात कोणी मरत ही नाही म्हणून सतगुरुला मेलेल्याचे दु:ख होत नाही तसेच तेथे कोणी मरेल याची त्यांना फिकीर ही राहत नाही.ते सतगुरु होणकाळासारखे मायेच्या सुखांचे कर्ते ही नाही आणि मायेच्या दु:खाचे हरते ही नाही.ते सतगुरु स्वत: सर्व सुखदाई आहे म्हणजे अमरलोकाच्या सुखांचे कर्ते आहे.ते सतगुरु सर्व सुखांनी परीपूर्ण आहेत.ते सुखांकरीता कोठून येतही नाही.तसेच कोठे जातही नाही.त्या सतगुरुपासूनच सर्व सुख प्रगटतात. जसे पारब्रम्ह मधूनच हंस मायेचे सुख घेण्याकरीता मृत्युलोकात येतात.तेथे सुख अपूर्ण पडले तर स्वर्गादिकात जातात असे ते सतगुरु कोठे येत जात नाही. ।।१२।।

**किलोळ लीला इम्रत धारा ।। ले हंस हंसनी ये सुख सारा ।।**

**अखुट खुटे तूटे न कोई ।। हीणे न खीणे नही एक सोई ।।१३।।**


अमरलोकात क्रिडा तसेच लिला अनंत प्रकारच्या महासुख देणाऱ्या आहेत.तो देश अमृताच्या धारा म्हणजे देहाला सदा अमर ठेवणाऱ्या अमृताने भरलेला आहे,त्या देशात येथून जाणारे हंस–हंसनी अनंत प्रकारचे सुख घेतात.तेथे स्त्री–पुरुष असा वेगवेगळा भिन्न लिंगभेद राहत नाही.तेथे सर्व हंसाचे एकसारखेच स्वरुप असते.त्या देशात अखूट म्हणजे न खुंटणारे सुख राहतात.तेथील सुख त्रिलोकीसारखे तुटणारे म्हणजे संपणारे राहत नाही,कमी होणारे राहत नाही.तेथील सुख घेतल्याने ते हिन ही होत नाही म्हणजे हलके ही होत नाही आणि क्षिण म्हणजे कमीही होत नाही.ते सर्व सुख सदा एकसारखेच सुख देणारे बनलेले राहतात. ।।१३।।

**हे सतरूपा वे सम द्रिष्टी ।। हे नांव न्यारा ब्रम्ह न भृष्टी ।।**

**हे देस देसा सतधाम धामा ।। जाहाँ हंस हंसनी नह कर्म कामा ।।१४।।**

तेथील सर्व हंस–हंसनीचे रुप सत आहे.त्रिलोकी सारखे असत किंवा नाश पावणारे नाही. ते सर्व संत समदृष्टी स्वभावाचे नाही.असे ते गुरुपद पारब्रम्ह तसेच मायेहून न्यारा आहे.ते गुरुनावपद पारब्रम्ह ही नाही आणि मायाही नाही.तो सतस्वरुप देशोदेश म्हणजे होणकाळ आणि मायेत ओतप्रोत आहे तसेच होणकाळाच्या पलिकडे ही भरपूर आहे.त्या सतस्वरुपाच्या धामात मायेचे ३ लोक १४भवन तसेच पारब्रम्हचे ३ब्रम्हचे १३ लोकासारखे अमरलोकांचे म्हणजे जीवांचे राहण्याचे सत्तधाम आहे.

त्या सतस्वरुपाच्या धामात गुरुनावाच्या आधाराने गेलेले हंस–हंसनी राहतात.ते सर्व




हंस–हंसनी विज्ञान स्वरुपी आहे. त्रिलोकातील सर्व हंस–हंसनी कर्म काळात लिपायमान आहे परंतु अमरधामामध्ये हंस–हंसनी कर्म काळापासून मुक्त असे निष्कर्मी आहेत.तेथील सर्व हंस–हंसनी निष्कामी आहे.जसे त्रिलोकीचे हंस–हंसनी कामी म्हणजे शब्द,स्पर्श,रुप,रस, गंध तसेच वेदांच्या करण्यांमध्ये रचमचलेले राहतात तसे ते नेकमात्रही नाही. ।।१४।।

**हे भोग भारी केता न आवे ।। पाप न पुन्न नही दोस गावे ।।**

**सबे सुख संपत में तें न क्रोधो ।। हंस नांव हंसनी महारूप सोधो ।।१५।।**

तेथील भोग फार भारी तऱ्हेचे आहेत.तेथील भोग येथे शब्दांमध्ये किंवा वस्तूमध्ये सांगता येत नाही.तेथे कोणी नरकीय जीवासारखे पापी ही नाही तसचे स्वर्गादिकाच्या जीवासारखे पुण्यवान ही नाही.ते हंस कोणाच्या बाबतीत दोष ही गात नाही.तेथे सुखांकरीता लागणारी सर्व संपत्ती आहे.तेथे त्रिलोकीसारखे कोणाच्यावर कोणाला क्रोध ही येत नाही,तेथे जाणाऱ्या हंस–हंसनीच्या देहाचे रुप येथील मनुष्य देहाच्या रुपापेक्षा खूप मोठे आहे.त्या रुपाला जोपर्यंत प्राप्त करत नाही तोपर्यंत त्या रुपाला

सतज्ञानानेच समजावे लागते दुसरी समजाविण्याकरीता कोणतीही नक्कल वस्तू त्रिलोकीत नाही. ।।१५।।

**सतरूप काया सतरूप माया ।। सतरूप सब चीज सेंजा बताया ।।**
**दुखरूप कामा ब्यापे न कोई ।। सुखरूप कामा महाबेग होई ।।१६।।**

तेथील काया सतस्वरुप ध्वनीची बनलेली आहे म्हणून तेथील काया सत म्हणजे तीन लोकांच्या मायेच्या पाच तत्वाच्या कायेसारखी मरणारी नाही.तेथील सर्व माया समस्वरुप ध्वनीची आहे.त्रिलोकीसारखे मरणाऱ्या पाच तत्वांची नाही.तेथे सर्व वस्तू कुद्रती बनलेल्या आहेत.येथल्या सारखे कृत्रिम रीतीने बनवावी नाही लागली.म्हणून तेथे सर्व वस्तु सहजात उपलब्ध आहे.तेथे काळ खाईल अशी एकही सुखाची कामना हंसाला व्यापत नाही.परंतु तेथे काळ खाणार नाही अशा सुखरुपी कामना फार लवकर लवकर व्यापतात. ।।१६।।

**जो सुख चावे से सुख सारा ।। सनमुख आवे ले हंस प्यारा ।।**
**सुखरूप कामा बोहो बिध सारा ।। महातेज लीया ले हंस न्यारा ।।१७।।**

तेथील हंस ज्या सुखाची चाहना करतात ते सर्व सुख समोर येऊन जातात.हंसाला सन्मुख आलेल्या सुखातून जे सुख प्रिय वाटतात.ते सुख ते हंस घेऊन घेतात.तेथे हंसांना कुद्रतीच काळाच्या दु:खापासून मुक्त अशा अनेक प्रकारच्या सुखरुपी कामना म्हणजे चाहना व्यापतात.ज्या ज्या चाहना उपजतात.ते सर्व सुख कुद्रतीच सन्मुख येऊन हजर होऊन जातात.तेथील सर्व हंस महातेजवान आहेत आणि ते तेथे आपले वेगवेगळे दिव्य सुख घेत राहतात. ।।१७।।

**त्रिलोक मांही पद नांव माया ।। सतलोक मांहि सतपद भाया ।।**
**यां चीज माया वां चीज अक्खी ।। यां चीज कच्ची वां चीज पक्की ।।१८।।**

त्रिलोकीच्या पदाचे नाव माया आहे म्हणजे हंसाला समोर सुख देणारी दिसते परंतु सदा सुख देणारी राहत नाही अशी असत राहते.सतलोकाची माया हंसाच्या समोर कुद्रती प्रगटते,सदा सुख देणारी राहते अशी सत राहते म्हणुन आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे,तेथील सुख देणाऱ्या वस्तू नाश होणाऱ्या आहेत म्हणजे हंसाला सदा सुख देण्याकरीता कच्च्या आहेत आणि तेथील वस्तू नाश न होणाऱ्या अखंड आहेत म्हणून तेथील वस्तु हंसाला सदा सुख देण्याकरीता पक्क्या आहेत. ।।१८।।

**इण चीज मांही सुख दु:ख दोई ।। उण चीज माही श्रब सुख होई ।।**
**ये दोय चीजा ब्रम्ह लेण हारो । बिन चीज ब्रम्ह आप सुनरूप प्यारो ।।१९।।**

त्रिलोकीच्या मायेच्या वस्तुंमध्ये सुख आणि दु:ख दोन्हीही आहेत.सतस्वरुपाच्या वस्तूंमध्ये सर्व दु:ख विरहित कोरे सुखच सुख आहे.या दोन्ही वस्तूंना म्हणजे मायेचे

आणि अमरलोकाच्या सुखांना ब्रम्ह म्हणजे हंसच घेणारा आहे. या दोन्ही सुखांशिवाय हंस बिना सुख–दुःखाचा असा पारब्रम्ह स्वरुपाचा ब्रम्ह बनतो.।।१९।।

**जो हंस माया त्यागे जो कोई ।। तो आप ही ब्रम्ह पदवी न होई ।।**
**सुख दु:ख रेतां ब्यापे न कोई ।। आ रीत प्रब्रम्ह के धाम होई ।।२०।।**

त्रिगुणी मायेचे सुख येथे जो हंस त्यागतो तो हंस पारब्रम्हची ब्रम्ह पदवी प्राप्त केलेला ब्रम्ह बनतो.त्या हंसाला मायेचे सुख आणि काळाचे दु:ख व्यापत नाही.हंसाला सुख–दु:ख न व्यापन्याची रीत पारब्रम्हच्या धामात आहे.।।२०।।

**श्रब सुख को सुख सतपद मांही ।। क्रत रूप माया को लेस नाही ।।**
**सतरूप सतचीज सतपद जाणो । ज्यां चीज क्रतब बिन पूर ठानो ।।२१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगत आहे की,कोऱ्या सुखांचेच सुखांचे पद हे सतस्वरुपाचे पद आहे. त्या पदात दु:ख देणाऱ्या कृत्रिम मायेचा लेशही नाही.तेथील सर्व वस्तु सतस्वरुपाची आहे त्रिलोकी सारखी असतस्वरुपी नाही.असे ते सतपद आहे. त्याला सर्व स्त्री–पुरुष,ज्ञानी–ध्यानी ओळखा.तेथे बिना कोण्या करतुत म्हणजे उद्यमाने सुखांच्या अपार,अनंत वस्तु प्रगट आहेत. ।।२१।।

**जो चीज चावे हे काया बिचारी ।। सो चीज भरपूर बिन दाम सारी ।।**
**नही आड़ अटकाव हट्के न कोई । नही चीज काजे पचणो न होई ।।२२।।**

तेथे हंस ज्या ज्या वस्तूंची चाहणा करतो त्या सर्व सुख देणाऱ्या वस्तू फुकटात भरपूर उपलब्ध असतात.तेथे त्रिलोकीसारखे सुखांच्या वस्तु पैसे देऊन विकत घ्याव्या लागत नाही.अमरलोकात त्या वस्तू उपभोगतांना कोणीही आड्वे येत नाही.मायेच्या लोकात माया कशी आड्वी येते याचा एक छोटासा/लहानसा दाखला पाहू .

दाखला–कोणाला सारखेची भारी आजार आहे आणि त्याला साखरेची वस्तू खाण्याची चाहणा झाली आहे.त्याने गोड वस्तू खाल्ली तर रक्तात साखर वाढते.रक्तात साखर वाढली तर प्रकृती बिघड्ते म्हणून घरचे लोक तसेच डॉक्टर साखरेची वस्तू खाण्याच्या आड्वे येतात.त्यांची गोष्ट नाही ऐकली आणि साखरेची वस्तू खाल्ली तर शरीर आड्वे येते म्हणजे आजारी पड्तो आणि आजाराचे दु:ख भोगावे लागतात.असे अमरलोकात होत नाही .तेथील शरीरच निरोगी आहे,विज्ञान स्वरुपाचा आहे.मायेसारखा नाशवान स्वरुपाचा नाही.म्हणून तेथील शरीराला कोणता आजार राहत नाही म्हणून तेथे गोड, खारट,अनुपम सर्व वस्तूंचे सर्व सुख भरपूर घेता येते.तेथे शरीरही बिना रोगाचे आहे आणि वस्तूंही भरपूर आहेत मग पाहिजे तसे अनेक प्रकारच्या गोड वस्तू खा तेथे मनाई नाही.असे जगात लहान–मोठे अनेक दाखले आहे.हा खूपच छोटासा दाखला दिला आहे.तेथे बिना पैशाने अनंत वस्तू आहेत म्हणून वस्तू घेणाऱ्यांना वस्तू घेण्यास

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

कोणी थांबवत नाही किंवा हटकत नाही.तेथे सर्व वस्तू सहजात उपलब्ध आहे म्हणून त्या वस्तूंना प्राप्त करण्याकरीता कोणीही पचत म्हणजे मेहनत करत नाही.तेथे सर्व वस्तू बिना मेहनतीने सदा उपलब्ध राहतात. ।।२२।।

**नही मोल आवे नही तोल देणी ।। उर मे सोचावे सो सत लेणी ।।**
**लिला सरूपी वां रीत सारी ।। नाना प्रकारा रंग राग भारी ।।२३।।**

तेथे वस्तू अनंत असल्या कारणाने त्रिलोकी सारखी कोणतीही वस्तू विकत नाही तसेच त्रिलोकी सारखी विकतही घ्यावी लागत नाही.तेथे कोणी कोणा जवळून वस्तू मोजून घेत नाही तसेच मोजून देतही नाही.ज्याच्या मनात जी येते ती वस्तू तो तेथे घेऊन घेतो. तेथील जीवन लिलास्वरुपी म्हणजे खेळण्या कुदण्यासारखे आहे.ज्याला जितके खेळायचे आहे खेळा म्हणजे सुख घ्यायचे आहे घेऊन घ्या,नाही घ्यायचे,नका घ्या,सोडून द्या.दुसरे सुख उपलब्ध आहेच असे खेळण्या–कुदण्यासारखे सुख घेण्याची रीत आहे.तेथील सुख नाना प्रकारच्या भारी भारी रंगरागाने भरलेले आहे.त्रिलोकीच्या सारखे कोणत्याही तऱ्हेची कंटाळा येणारे सुख तेथे नाही. ।।२३।।

**नही सोच दूजो ब्यापे न जाणे ।। केळा करण रीत बोहो बिध आणे ।।**
**बिनचंद बिनसूर हे तेज भारी ।। नही रेण की लेस नीद्रा बिचारी ।।२४।।**

तेथे त्रिलोकीसारखे कोणत्याही तऱ्हेची काळजी राहत नाही.तसेच काळजी होतही नाही आणि कोणास कोणत्याही तऱ्हेची फिकीरही होत नाही.तेथे सर्व हंस अनेक तऱ्हेच्या क्रिडा करण्याची म्हणजे सुख घेण्याची रीत जाणतात आणि ते नेहमी पुष्कळ तऱ्हेने सुख घेण्याची क्रिडा म्हणजे खेळ करतात.तेथे चंद्र तसेच सुर्याशिवाय फार भारी सुहावना तेज म्हणजे प्रकाश असतो.तेथे रात्र लेशमात्रही नाही आणि तेथे झोपेचा विचार तर कोणी जाणतच नाही. ।।२४।।

**हे तेज रूपी सबे हंस सारा ।। द्रब रूप काया कोटां उजीयारां ।।**
**रहे रूंम मांही ये तेज जाणो । इण सूरज को तेज नकल न आणो ।।२५।।**

तेथील सर्व हंस तेजवान आहेत. त्या हंसांची दिव्यरुपी काया आहेत. एक एक हंसाचा एक कोटी सुर्यासारखा आनंद देणारा सुहावणा प्रकाश त्यांच्या एक एक रोमातून उदित होतो.येथील सुर्याचे तेज त्या तेजाची नक्कल समजण्यात येईल इतकाही नाही.अशी त्या देशाच्या हंसाची काया दिव्यरुपी तेजाची आहे.।।२५।।

**चंद सूर तारा सबे एक कीजे ।। ऊण हंस के रूम नकल न लीजे ।।**
**वा सब ही हंस हे जोत धारी ।। इण काज उण देस नही रेण प्यारी ।।२६।।**

येथील चंद्र,सुर्य व सर्व ताऱ्यांचा प्रकाश एका ठिकाणी एकत्रित केला तरीही तेथील हंसाच्या एका रोमाच्या तेजासारखे नक्कल रुपातही पकडता येत नाही.असे आदि सतगुरु

सुखरामजी महाराज सांगत आहे.तेथील सारे हंस दिव्यज्योती सारखे प्रकाशमय आहेत. या कारणाने त्या देशात रात्र होत नाही. ।।२६।।

**सब हंस के शिर रहे छत्र छाया ।। अब देह को रूप कहुँ दिष्ट आया ।।**
**छोटीसी काया हे क्रांत भारी ।। दस गज की देहे ले हंस धारी ।।२७।।**

त्या सर्व हंसांच्या शिरावार कुद्रतीच छत्राची छाया राहते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात त्यांच्या देहाचे स्वरुप माझ्या दृष्टीत आले ते मी सांगतो.त्यांची काया लहान आहे परंतु त्यांच्या देहाची कांती म्हणजे पराक्रम फार भारी आहे.तेथील एक एक हंसाचा देह दहा गजाचा आहे.।।२७।।

**सो गज न्यारा नही अे जाणो ।। दस गजको गज वो पाव ठाणो ।।**
**वां देह अेसी महारूप लीया ।। कहता न आवे गत कोट कीया ।।२८।।**

अमरलोकाचा गज मृत्युलोकाच्या गजाहून वेगळा आहे.तेथील गज मृत्युलोकाच्या गजासारखा गज समजू नका.मृत्युलोकाच्या दहा गजाचा तेथे पाव गज होतो .

| अमरलोकात | | मृत्युलोकात |
|---|---|---|
| १/४ गज | = | १० गज |
| १ गज | = | ४० गज |
| १० गज | = | ४०० गज |

मृत्युलोकाच्या गजाने तेथील काया मोजली तर ४०० गज भरते .

१ गज = ३ फुट

४०० गज ३ फुट = १२०० फुट

अशी तेथील संताची काया मृत्युलोकातील फुटाने १२०० फुटाची भरेल.असा हा १२०० फुटाचा मोठा महारुपवान देह अमरलोकात असतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,त्या देहाचे मी वर्णन सांगण्याचा प्रयत्न करतो तरीही माझ्याने जसेच्या तसे वर्णन केले जात नाही.मी वर्णन करुन राहिलो आहे त्याच्यापेक्षा शंभर लक्ष गती त्या देहाला जास्त समजा. ।।२८।।

**यां चंद सूरज ताराज होई ।। मिण रूप पदम रतन नग सोई ।।**
**इण तेज को रूप ऊण देस नाही । क्या कर कहिये कहयो काहां जाई ।।२९।।**

येथील चंद्र,सुर्य,सर्व तारे,सर्व चंद्रमणी सारखे मणी,सर्व रत्न,पद्ममणी सारख्या रुपाचे सर्व नग इत्यादी मिळून जे तेज बनते अशा तेजाच्या रुपाची त्या देशात नक्कल ही पहायला मिळत नाही.असे त्या देशाचे तेज दिव्यरुप आहे.तेथील तेजाची तुलना जगाच्या स्त्री-पुरुषांना सांगण्याचा प्रयत्नही केला तरीही सांगितला जात नाही.असा मोठा सोच माझ्या समोर आहे. ।।२९।।

यां अेक अेनाण नकल न होई ।। बिन ग्यान भ्यासा सूजे न कोई ।।
आं नकल हे नेक इण जुग मांही । सतगुरू को ग्यान गुरूगम जांही ।।३०।।

येथे तीन लोकात त्यांचे निशाण किंवा नक्कल काहीच नाही की त्याला त्या बरोबरीत लावून दाखविले तर येथील हंसांना समजेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्ञानाने भ्यास म्हणजे समज शिवाय तेथील स्वरुप,तेज,वस्तू कोणाला काहीच सुजणार नाही.ज्ञानाचा भ्यास झाल्यावर तेथील वस्तूंची काही समज येईल हिच एक छोटीशी नक्कल या जगात आहे.अशा प्रकारे सतगुरुच्या ज्ञानाशिवाय अन्य कोणत्या वस्तूने गुरु देशाची समज येत नाही.।।३०।।

इण तेज नकल वां जोत जाणो ।। ज्युं ज्ञान केवळ हिरदे पिछाणो ।।
अेहे लोक माही अे नकल होई । सतलोक की नकल नही ओर कोई ।।३१।।

जसे कोणी भरपूर प्रकाशाच्या वस्तूला ज्योतीचा प्रकाश नक्कल रुपात पाहून समज मध्ये आणता येते तसेच तेथील कैवल्यज्ञान विज्ञानाच्या गोष्टी गुरुज्ञानाने हृदयात ओळखाव्या लागतात.या मृत्युलोकात अमरलोकाला गुरुज्ञानाने ओळखणे हिच एकमात्र नक्कल आहे. त्या सतलोकाला येथे मृत्युलोकात ओळखण्याची दुसरी कोणती नक्कल नाही.।।३१।।

कह सुखदेव सुणो चित्त गोई ।। सत लोक को सुख इण रीत होई ।।
नही तोल नही मोल नही माप आवे । सतगुरू सन्मुख से हंस पावे ।।३२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व हंसांना चित्त लावून ऐकण्यास सांगतात की, सत्त लोकाच्या सुखाचे मृत्युलोकात कोणते माप करता येत नाही,कोणती किंमत ही लावता येत नाही आणि त्याला वजनातही मोजता येत नाही म्हणजे सत्तलोकाच्या वस्तू मृत्युलोकात कोण्या वस्तूच्या बरोबरीत किंवा नक्कल रुपात दाखविता येत नाही असा अनूप अनंत सुखांच्या वस्तूंचा तो देश आहे.ते सुख हंसाला सतगुरुच्या सन्मुख गेल्यावरच मिळतील.जो सतगुरुच्या शरणात जाणार नाही त्याला अमरलोकाचे अनूप सुख कधी मिळणार नाही. ।।३२।।

रेखता ।।

सत का लोक मे सत्त ही सत हे ।। असत को नांव सो नाही जाणे ।।
सत का पेरणा सतका ओढणा ।। सत का सुख सो सरब माणे ।।
सत की देह अर सत का राछ सो ।। सत्त का मेहेल अे वास होई ।।
सत की ईंद्रियाँ सत की चीज सो ।। सत्त का लेण अर देण दोई ।।
माया का लोक में माया सो चीज हे ।। ग्यान कर देखलो सरब सारा ।।
दास सुखराम क्हे सतका लोक में ।। सत का सुख हे अखंड प्यारा ।।१।।

सत्तचे लोक म्हणजे अमरलोकात सर्व सत्तच सत्त आहे.तेथे असतचे नाव कोणीही जाणत

नाही.तेथे तीन लोकांसारखी मायारुपी मिटणारी वस्तू कोणीही जाणत नाही.तेथे शरीरावर सत्तचे वस्त्र घालणे आणि सत्तचेच वस्त्र पांघरण्याचे आहे.तेथील सर्व सुख सत्तचे आहे.ते सत्तचे सुख सर्व हंस भोगतात.तेथे सत्तचे शरीर आहे.तेथे राहण्याचे महाल तसेच मकान सत्तचे आहे.तेथील शरीराचे इंद्रिये ही सत्तचे आहे.अशाप्रकारे तेथील सर्व वस्तू सत्तच्या आहेत आणि तेथे घेणे-देणे ही सत्तचेच आहे.या मायेच्या लोकात सर्व वस्तू मायेच्या आहेत.हे गुरुज्ञान करुन सर्व स्त्री-पुरुष पाहून घ्या.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,त्या सत्तच्या लोकात सर्व सुख सत्त आहे,अखंडित आहे,मायेसमान मिटणारे नाही म्हणून तेथील सुख सर्वांना प्रिय आहेत.।।१।।

कुंडल्यो ।।

मे बोपारी ग्यान का ।। ओर बिणज नही कोय ।।
जे तुम चावो मोख कुं ।। तो ग्यान बिणज लो जोय ।।
ग्यान बिणज लो जोय ।। कसर राखो मत कांई ।।
जो चाहो सोई ग्यान ।। आण बूझो मुझ भाई ।।
सुखराम इसा देवाल हे ।। हे कोई लेणे हार ।।
अमर लोक ले जाव सूं ।। जामे फेर न सार ।।२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी मोक्षाच्या ज्ञानाचा व्यापारी आहे. माझ्याजवळ मोक्षाच्या ज्ञानाशिवाय मायेच्या पर्चे चमत्काराचा थोडासाही व्यापार नाही. जर तुम्ही मोक्ष चाहत असाल तर तुम्ही माझ्याजवळून मोक्ष प्रगट करण्याचे ज्ञान विज्ञान घेऊन घ्या.माझ्या जवळून ज्ञान विज्ञान घेण्यात काहीच कसर ठेवू नका.अमरलोकास पोहचण्यास जे काही ज्ञान लागत असेल ते ज्ञान विज्ञान माझ्याकडून विचारुन घ्या. तुम्ही मी ते ज्ञान विज्ञान भिन्न भिन्न प्रकाराने समजवून देईन.मी असा ज्ञान विज्ञान देणारा व्यापारी आहे की जो कोणी विज्ञान घेणारा आहे त्याला मी विज्ञानाचा भेद देऊन माझ्या सोबत अमरलोकास घेऊन जाईल.माझे ज्ञान-विज्ञान धारण करणाऱ्या हंसाचे अमरलोक जाण्यास थोडेसेही अंतर पडणार नाही. ।।२।।

कवत ।।

अमर लोक ने जाय ।। जको रस्तो कहुँ तोही ।।
सुणो सकळ नर नार ।। कसर राखुं नही कोई ।।
ओ तन ओ बेराट ।। जिकण सुं न्यारो क्‍ावे ।।
अेकबिस ब्रहमंड ।। चूर बिरळा जन जावे ।।
सुखराम अधर सतलोक हे ।। अधर जमी वां जाण ।।
वां देख्या आ अेथली ।। कर नर हात पिछाण ।।३।।

ज्या रस्त्याने अमरलोकात हंस जातात तो रस्ता मी तुम्हाला सांगतो तो रस्ता सर्व स्त्री

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

–पुरुषांनो ऐका.मी तो रस्ता सांगण्यात कोणतीही कसर ठेवणार नाही.तो अमरलोक या पिंडाहून तसेच खंड–ब्रम्हंड वैराटच्या पलीकडे आहे.त्या अमरलोकात शरीराचे२१ ब्रम्हंड म्हणजे २१स्वर्ग छेदून जावे लागते.२१ स्वर्ग छेदून जाणे फार कठिण आहे.म्हणून अमरलोकास विरळेच संत जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,तो सतलोक अधर आहे.तेथील जमीनही अधर आहे.जसे मनुष्याचा तळहात अधर राहतो त्याला कोणाचा टेका राहत नाही तसा तेथे तो अमरलोक पाहिल्यावर तळहातासारखा बिना टेक्याचा दिसतो.।।३।।

कुंडल्या ।।

कळजुग वारो मोख को ।। भरत खंड के मांय ।।
भजन करे सो जीव रे ।। बारे उपजे आय ।।
बारे उपजे आय ।। ग्यान केवळ घट आवे ।।
अर दरसण कर कर हंस ।। मोख क्रोडा लख जावे ।।
सुखराम चोईसी प्रगटे ।। सतजुग त्रेता मांय ।।
कळजुग बारो मोख को ।। भरत खंड के मांय ।।४।।

कलियुगात मोक्षाचा वारा म्हणजे अमरलोकात सहज जाण्याची वेळ या भरत खंडात येतो. ज्या ज्या हंसाने पहिले परमपदाचे भजन केले आहे परंतु ते अपूर्णतेच्या कारणाने मोक्षात पोहचू शकले नाही.असे सर्व जीव मोक्षात सहज जाण्याच्या वेळी भरत खंडात जन्म घेतात.असे सर्व हंस भवतारी संताचे दर्शन करताच म्हणजे शरणात येताच त्यांच्या घटात केवलज्ञान विज्ञान प्रगट होते आणि ते मोक्षात जाण्याचे अधिकारी बनून जातात. जसे सतयुग,त्रेतायुग,द्वापारयुगात चोवीस तिर्थकर प्रगट होतात आणि त्यांच्या सोबत कोटी हंस मोक्षात जातात.त्याचप्रमाणे कलियुगात भवतारी संत भरतखंडात प्रगटतात तेव्हा त्यांच्या सत्तेने कोटी लक्ष हंस मोक्षास जातात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४।।

भगवत बीसी नित नवी ।। बदे खेतर मांह ।।
अेक भवतारी संत जन ।। जनम धरे वां आय ।।
जनम धरे वां आय ।। मोख वां सु हंस जावे ।।
अर बिन दरसण भगवंत ।। ग्यान घट मे नही आवे ।।
सुखराम सदाई वां समो ।। हंस मोख नित जाय ।।
भगवत बीसी नित नवी ।। विदेह खेतर माय ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, विदेही क्षेत्रात वीस भगवंताची वस्ती नेहमी कायम राहते.या वीस भगवंताची वस्ती नेहमी कायम राहते.या वीस भगवंतामधून

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

कोणीही भगवंत धाम गेल्यानंतर ती सत्ता दुसऱ्या नवीन भगवंतामध्ये जागृत होऊन जाते.अशाप्रकारे वीस भगवंत येथे कायम असतात,ते कमी होत नाही.षटदर्शन अंगानुसार आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,

'' केई जनम शुभ कर्म करे,तब प्रगटे भक्त अंकुर ''

असे शुभ कर्म करविण्याची रीत या वीस भगवंताजवळ असते.।।५।।

ओ तो रस्तो बेहे रहयो ।। निमख ढील नही खाय ।।
समो आया सुखराम क्हे ।। क्रोड़ाई हंस जाय ।।
क्रोडाई हंस जाय ।। संत सामा चल आवे ।।
सत जळ करावे स्नान ।। अमर कपडा बण जावे ।।
अमर काया धाम रे ।। लेवे संत बधाय ।।
ओ तो रस्तो बह रहयो ।। निमष ढील नहीं खाय ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या तऱ्हेने अमरलोकाचा रस्ता नित्य वाहून राहिला आहे.तो रस्ता निमिष भरही बंद राहत नाही.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मोक्षात जाण्याची वेळे येते म्हणजे भवतारी संत जन्मतात तेव्हा कोट्यावधी हंस मोक्षास जातात.जेव्हा हंस अमरलोकास पोहोचतो तेव्हा तेथील संत आनंदित होऊन त्यांच्या अगवाणीत सामोरे चालून येतात.तेथील संत प्रितीने येथून जाणाऱ्या संताला सत्तजलाने स्नान करवितात.तेथे पोहोचलेल्या संताचे कपडे अमर होऊन जातात.तेथे संतांचे राहण्याचे मकान अमर आहे.येथून जाणाऱ्या संतांचे तेथील संत बधावा करुन म्हणजे उत्सव करुन मंदीर,महालांमध्ये घेऊन जातात. ।।६।।

अमर मिंदर मालिया ।। अमर झिरोखा मांय ।।
अमर लुंबाळु ढोलियां ।। तां मे कसर न काय ।।
तां मे कसर न काय ।। अमर संत बिराजे सारा ।।
अटल अमर वो धाम ।। सुख को बार न पारा ।।
सुखराम अथंगा अमर सुख ।। हे ज्युं कहयो न जाय ।।
अमर मिंदर मालिया ।। अमर झिरोखा मांय ।।७।।

तेथील मंदिर अमर आहेत.तेथील महाल अमर आहेत.तेथील महालांचे झरोकेही अमर आहेत.तेथील बंगळ्या अमर आहेत.तेथील पलंग अमर आहेत.येथील मंदीर,महाल, बंगळ्या,पलंग काही काळानंतर जसे नाश होतात तशी कसर तेथील मंदिर,महाल, झरोके,बंगळ्या,पलंगात नाही.अमर झालेले संत तेथील मंदिरात,महालात,बंगळ्यावर, पलंगावर विराजतात.तो धाम अटळ आहे,नाश न होणारा आहे,अमर आहे.त्या अमरधामात सुखाचा वारपार येत नाही.तेथील अमर सुख अथांग आहेत. त्या सुखांचा थांग लागत

नाही.ते सुख इतके अद्भूत आहे की,त्यांचे वर्णन मुखाने केले जात नाही. ।।७।।

अखंड सुख अनंद लोक में ।। सब ही हाजर होय ।।
अमर लोक का संत रे ।। केल करे कहु तोय ।।
केल करे कहुं तोय ।। आनंद उच्छाव सदाइ ।।
धिन धिन कह महाराज ।। कमी कसर नही काई ।।
द्रब उजाळा अंग मे ।। बडा पुरष कहुं तोय ।।
अखंड सुख अणंद में ।। सब ही हाजर होय ।।८।।

त्या आनंदलोकांत सर्व खंडित न होणारे अखंडित सुख आहे.ते हंसाच्या समोर येऊन हजर होतात.तेथे अमरलोकात राहणारे संत भिन्न भिन्न प्रकारच्या क्रिडा करतात, लिला करतात,खेळ करतात.या कारणाने तेथे सदा आनंद उत्सव चालतच असतो.तेथे पोहोचलेले सर्व संत धन्य आहेत.सर्व संत महाराज आहेत.त्यांच्या महाराज बनण्यात कोणती कसर नाही.सर्व संतांच्या शरीरात दिव्य प्रकाश आहे.अशाप्रकारे तेथे विराजलेले सर्व संत मोठे पुरुष आहेत. ।।८।।

द्रब उजाळा होय रहया ।। द्रब जमी वां जोय ।।
सबे सरीसा संत हे ।। द्रब रूप कहुँ तोय ।।
द्रब रूप कहुँ तोय ।। द्रब चीजा सब सारी ।।
द्रब महल अे बास ।। द्रब फुली फुलवारी ।।
सुखराम द्रब सबै देस वो ।। जा रेण दिवस नहीं दोय ।।
द्रब उजाळा व्हे रहया ।। द्रब जमी वां जोय ।।९।।

अमरलोकात दिव्य प्रकाश होऊन राहिला आहे.तेथील जमीन ही दिव्य आहे.या जमीनी सारखी नाश होणारी जमीन तेथे नाही.तेथे पोहोचलेल्या सर्व संतांचे रुप दिव्य आहे. त्यांचे रुप मृत्युलोकाच्या लोकांसारखा वेगवेगळा नाही.तसेच मृत्युलोका सारखा कुरुप तसेच सुंदर असेही नाही.तेथील संतांचे रुप दिव्य सुंदर आहे आणि एकसारखे आहे. तेथील सर्व वस्तू दिव्य आहे. तेथील महल तसेच राहण्याची वास्तू दिव्य आहे.येथील महल किंवा वास्तू सारख्या नाश होणाऱ्या दगड,माती,काचाचे बनलेले नाही.ते मकान विचार करु शकत नाही अशा दिव्य वस्तूंनी बनलेले आहे. तेथील फुलवारी म्हणजे फुलांचे बगीचे दिव्य फुलांनी फुललेले आहे.येथील कोमजलेल्या फुलांसारखे नाही.असा तो पूर्ण देशच दिव्य आहे.तेथे मृत्युलोकासारखी रात्र किंवा दिवस हे दोन्ही काहीच नाही.तेथे रात्र किंवा दिवस असे वेगवेगळे कोणी जाणतही नाही.तेथे सदा सुख भोगण्याची वेळ असते.।।९।।

बावन गादी ऊपरे ।। पुरष फिरे कहुं अेक ।।

वो सुख को सागर प्रस्तो ।। आबे पुरब लेख ।।
आबे पुरब लेख ।। जना कुं लेले जावे ।।
बड़ो पुरष तप तेज ।। बाट अटकण नही पावे ।।
सुखराम काट फंद जीव का ।। तारे हंस अनेक ।।
बावन गादी ऊपरे ।। पुरष फिरे कहुं एक ।।१०।।

तेथे बावन गादी आहेत.त्याच्यावर एक पुरुष फिरत असतो.त्याला फरिस्ता म्हणतात. तो सुखाचा सागर आहे.तो हंसाच्या पूर्वीच्या कर्म रेषेने मृत्युलोकात येतो आणि येथून संतांना अमरलोकास घेऊन जातो.तो फरिस्ता मोठा पुरुष आहे.त्याचे तप व तेज अद्भूत आहे.त्याला हंसाला अमरलोकास घेऊन जाते वेळी रस्त्यात कोणी अटकवू शकत नाही.तो फरिस्ता सतपुरुष जीवाचे मायेचे आणि काळाचे सर्व फंद कापतो आणि सोबत अनेक जीवांना अमरलोकास घेऊन जातो.।।१०।।

नो क्रोड़ जन पोहोंचिया ।। अेक चोईसी लार ।।
आगे अनंताई पोंचीया ।। अनंताई पोहोचण हार ।।
अनंताई पोंहोचण हार ।। भगत को प्राक्रम भारी ।।
जो शिंवरे निजनांव ।। मोख को व्हे अधिकारी ।।
सुखराम परमपद नांव हे ।। भजजो बारम्बार ।।
नो क्रोड जन पोहोंचिया ।। अेक चोईसी लार ।।११।।

एक चोवीसच्या बरोबर नऊ कोटी हंस अमरलोकात पोहोचले.पूर्वी ही अनंत हंस अमरलोकात पोहचून गेले आणि पुढे ही अनंत हंस अमरलोकात पोहचतील.या विज्ञान भक्तीचा फार भारी पराकम आहे.जो कोणी या विज्ञान भक्तीचा म्हणजे निजनावाचे स्मरण करेल तो मोक्षाचा अधिकारी बनेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे निजनावच परमपद आहे म्हणून सर्व स्त्री–पुरुषाने निजनावाचे वेळी अवेळी वारंवार भजन केले पाहिजे.।।११।।

आद भजो जन रिषभ देव ।। अंत भज्यो महाबीर ।।
आठ पोहोर सिवरण किया ।। धर चित ध्यान सधीर ।।
धर चित ध्यान सधीर ।। इकंतर आसण कीना ।।
छांड दिया सब भ्रम ।। जगत सुं चारत लीना ।।
केवल भज केवल हुवा ।। चुगे हंस तहां हीर ।।
आद भज्यो जन रिषभ देव ।। अंत भजो महाबिर ।।१२।।

सतयुग, त्रेतायुग आणि द्वापारयुगात सर्व चोवीस तिर्थकर झाले. त्यात पहिल्या प्रथम ऋषभदेव आणि अंती महावीर झाले. त्या सर्व चोवीस तिर्थकरांनी या नावाचे स्मरण

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

केले. त्यांनी या नावाला चित्तात धारण केले आणि त्या नामाला धैर्यपूर्वक रात्रं–दिवस भजा. चित्ताला ध्यानात एकाग्र करुन धैर्यपूर्वक एकांतात आसन लावले आणि खोट्या मायेच्या सुखांना खरे समजण्याचे सर्व भ्रम त्यागून दिले.हे चोवीसही तिर्थंकर मोठे राजा होते.मोठे राजा असूनही जगाशी एकही संबंध न ठेवता जगाशी वेगळे होऊन गेले आणि फक्त एकमात्र केवल भक्ती करुन केवली होऊन गेले आणि सुखाच्या सागराचे हंस बनून महासुखाचे हिरे वेचू लागले.।।१२।।

अब ममता त्रपत भई ।। सतगुरू सरणे आय ।।
बोहोत आनंद सुख ऊपना ।। सांसो गयो बिलाय ।।
सांसो गयो बिलाय ।। दुख की लेस न काई ।।
सब दिन सुख मे जाय ।। अबे नही मुड़े मुडाई ।।
सुखराम आण सनमुख भई ।। चरणा लागी जाय ।।
अब ममता त्रपत भई ।। सतगुरू सरणे आय ।।१३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुच्या शरणात आल्याने माझी ममता जी त्रिगुंणी मायेच्या सुखांमध्ये सुख शोधत होती आणि ते सुख प्राप्त करण्या करीता अतृप्त बनलेली राहत होती ती तृप्त होऊन गेली.मला सतगुरुच्या शरणात आल्यावर फार आनंद झाला आणि फार सुख झाले.माझी सुखाची फिकीर मिटून गेली आणि त्याच बरोबर दु:ख लेसभरही राहिले नाही.आता सर्व दिवस सुखात व्यतीत होऊन राहिले.आता ही ममता मायेच्या सुखात पलटविल्याने ही पलटत नाही आणि हे सुख पाहून माझ्या सन्मुख होऊन गेली.हे ममताचे पलटणे सतगुरुच्या शरणात आल्याने झाले.।।१३।।

कवित ।।


मृत लोक का भोग ।। सरब सुख लील बिलासा ।।
कर उद्यम नर नार ।। सकळ पुरे मन आसा ।।
देव लोक का भोग ।। देव एसी बिध पावे ।।
मन उपज्यां बिसवास ।। सरब हाजर होय आवे ।।
आई रीत बेराट ।। सरब पुरीयां मे होई ।।
अमर लोक का भोग ।। सरब हाजर कहुं तोई ।।
सुखराम परम सुण धाम का ।। कांहा सुख करूं बखाण ।।
तीन लोक में रीत हे ।। कही नकल सी जाण ।।१४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की, या मृत्युलोकाचे सर्व भोग आणि मृत्युलोकाचे सर्वच सुख, सर्व लिला, सर्व विलास हे स्त्री–पुरुष जसे त्यांच्या मनाला

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सुख पाहिजे तसे उद्यम करतील तर त्यांना मिळतील म्हणजे त्यांच्या सुखांची सर्व आशा पूर्ण होईल.ते उद्यम नाही करणार तर त्यांच्या मनाला जे सुख पाहिजे ती आशा कधी पूर्ण होणार नाही.देवलोकात पोहोचलेल्या देवाला जो भोग पाहिजे त्याचा विश्वास त्याच्या मनाला येईल तरच तेथील सर्व भोग त्याच्या समोर हजर होतील.तेथे देवताला विश्वास नाही आला तर त्याला ते भोग मिळणार नाही.अशाप्रकारे सुख मिळण्याची रीत त्या देवतांच्या सर्व पुऱ्यांमध्ये आहे.मनाला विश्वास येईल तर भोग मिळेल, विश्वास नाही आला तर भोग मिळणार नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अमरलोकात हंसाच्या समोर सर्व प्रकारचे भोग कुद्रती हजर होऊन जातात. त्या भोगांकरीता तेथे मृत्यु तथा देवता लोकांसारखे काहीही करावे लागत नाही.असे त्या परमधामाचे सुख आहे.त्या परमधामाच्या सुखांचे वर्णन मी काय वर्णन करुन सांगू? सांगण्याकरीता येथे माझ्याजवळ काही नक्कलही नाही.अशाप्रकारे तिन्ही लोकांच्या सुखांची वेगवेगळी रीत आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मृत्युलोकाचे तसेच देवलोकाचे सुख सर्वांना समजविता येतात परंतु परमधामाचे सुख कसे वर्णन करावे हे मला समज नाही.म्हणून त्या परमधामाचे सुख गुरु ज्ञान दृष्टीने समजविणे ही एक नक्कल आहे.।।१४।।

**ब्रम्ह सदाई अमर हे ।। जा का काहां बखाण ।।**
**अमर माया धाम हे ।। सो नर इधकी जाण ।।**
**सो नर इधकी जाण ।। ब्रम्ह तो डिगे न कोई ।।**
**जो माया तज जाय ।। अरथ बिन निकमो होई ।।**
**सुखराम हद बेहद लग ।। जनम मरण गत जाण ।।**
**ब्रम्ह सदाई अमर हे ।। जा कां काहा बखाण ।।१५।।**




आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, सतस्वरुप ब्रम्ह सदा अमर आहे.त्याची मी काय महिमा करु.सतस्वरुप ब्रम्हच्या मायेच्या लोकात ३ लोक १४ भवन,४ पुऱ्या आहेत आणि पारब्रम्हच्या लोकात तीन ब्रम्हचे १३ लोक आहेत.हे दोन्ही सोडून दिले तर बाकी शिल्लक राहिलेल्या सतस्वरुप ब्रम्हमध्ये अमरलोक आहे.

✻ सतस्वरुप–(३ लोक १४ भवन + ३ ब्रम्हचे १३ लोक)=अमरलोक

✻ सतस्वरुप–होणकाळ=अमरलोक

अमरलोक म्हणजे मृत्युलोकातून विज्ञान ज्ञान प्राप्त करुन पोहचलेल्या लोकांची वस्ती. त्या अमरपदात ३ लोकासारखे लोक राहतात म्हणून त्याला अमरलोक म्हणतात.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सतस्वरुप ब्रम्हच्या पारब्रम्हपदात सुख आणि दुःख दोन्ही नाही तसेच त्याच्या मायेच्या पदात सुख आणि सुखासोबत महादुःख आहे.हे दोन्ही माया आणि ब्रम्हचे पद सोडून त्याच्या शेष राहणाऱ्या पदात सुख सुख आहे. ते शेष पद अमरलोकाचे पद आहे.ते पद सतस्वरुपाच्या ब्रम्हपदाहून आणि सतस्वरुपाच्या माया पदाहून अधिक विशेष आहे.तो सतस्वरुप ब्रम्ह मायेसारखा झामगत नाही म्हणजे कमी जास्त होत नाही असेच अमर माया नाश होणाऱ्या मायेसारखी कमी जास्त होत नाही.ती अमरमाया हंसाला सदा सुख देणारी असते.होणकाळात माया त्यागल्याने हंस ब्रम्ह बनतो परंतु सुखाशिवाय निकम्मा होऊन जातो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात, हंसाला हद म्हणजे आकाशाच्या खाली आणि बेहद म्हणजे पारब्रम्हच्या पलिकडे मायेनेच सुख मिळतात. माया सोडली तर हंस ब्रम्ह बनतो.पारब्रम्ह पदाचा निवासी बनतो आणि तेथे बिना सुखाचा निकम्मा बनतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हंसाला जन्मा पासून ते मरेपर्यत मायेनेच सुख मिळतात आणि सतस्वरुपाच्या गती पदात म्हणजे मोक्षपदात पोहचल्यावरही मायेनेच सुख मिळतात.मायेच्या सुखाविना हंस पारब्रम्हात बिना सुखाचा निकम्मा राहतो.आधिपासूनच हंस ही सुखच चाहतो.तो बिना सुखाचा राहू शकत नाही म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात की,मायेचा तीन लोकांचा धाम त्याग आणि अमर मायाधाम प्राप्त करा.हे दोन्ही मायेचे धाम सतस्वरुप ब्रम्ह मध्येच आहे परंतु अमर मायाधाम हे तीन लोकाच्या माया धामाहून अधिक विशेष आहे.या अमरमायेच्या धामात काळाचे दुःख लेसभरही नाही. ।।१५।।

दोहा ।।

**ओ तो रस्तो बह रहयो ।। निमष ढील नही खाय ।।**
**समो आया सुखराम के ।। क्रोड़ाई हंस जाय ।।१।।**

हा अमरलोकास जाण्याचा रस्ता वाहून राहिला आहे.हा रस्ता निमिष मात्र ही थांबत नाही.वेळ आल्यावर कोटी लक्ष हंस अमरलोकात जातात. ।।१।।

**सत बेराग अमीफल ईम्रत ।। पीवत ही गुण कीया ।।**
**युं निजनांव संत जन जाण्यो ।। जाय चोथा पद लीया ।।२।।**

सतवैराग अमृतफळासारखे आहे.अमृत पिताच आणि अमरफळ खाताच गुण करतो, त्याचप्रमाणे सतवैराग्य बिना विलंब अमरलोक प्राप्त करण्याचा गुण करतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे की,जो या निजनावाला मोक्ष प्राप्त करण्याचे रत्न जाणतात. ते सर्व हंस मायेचे स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीन पद त्यागून महासुखाचे चौथेपद म्हणजे सतस्वरुप पदात जातात.।।२।।

।। इति अमर लोक मेहेमा ग्रंथ संपूरण ।।